खाजगीकरणांतर्गत पथकर वसूली सुरु असलेल्या प्रकल्पांचा Roughness Index तपासण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक- खाक्षेस- २०१६/प्र.क्र.१३३/रस्ते-९अ**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- २५.१०.२०१७.

**परिपत्रक**

खाजगीकरणांतर्गत हाती घेतलेल्या प्रकल्पांमध्ये संपूर्ण सवलत कालावधीमध्ये रस्त्याची देखभाल दुरुस्ती करणे व रस्ता वाहतूकीस सुयोग्य ठेवणे ही संपूर्णपणे उद्योजकाची जबाबदारी आहे. मात्र असे निदर्शनास आले आहे की, वेळीच रस्त्याची देखभाल दुरुस्ती उद्योजकाकडून होत नसल्यामुळे रस्त्यावर खड्डे पडून रस्ता वाहतूकीस सुस्थितीत रहात नाही व अपघाताची शक्यता वाढते.

करारनाम्यातील तरतूदीनुसार आवश्यक असलेला Roughness Index मानकाप्रमाणे आहे किंवा नाही याची पडताळणी करुन रस्त्याची दुरुस्ती करावी. याबाबत यापूर्वी दिनांक २४.०८.२०१६ रोजीच्या पत्रान्वये व दिनांक २६.०९.२०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व क्षेत्रिय अधिकारी यांना सूचित करण्यात आले होते. आता त्याच बाबत सुधारीत सुचना या परिपत्रकाद्वारे जारी करण्यात येत आहेत.

आता खालील प्रमाणे सुधारीत निर्देश देण्यात येत आहेत.

१) Roughness Index प्रत्येक महिन्यात उद्योजकाने घेऊन विभागीय कार्यालयास सादर करावे.

२) Roughness Index बाबत विभागिय स्तरावर नवीन Log Book तयार करण्यात यावे, यामध्ये Roughness Index चाचणीचा दिनांक, निष्कर्ष व अभिप्राय असावेत.

३) मुख्य अभियंता यांनी दर तीन महिन्यातून एकदा Roughness Index ची चाचणी व त्याअनुषंगाने रस्त्याच्या स्थितीचा आढावा घ्यावा.

४) अधीक्षक अभियंता यांनी दर दोन महिन्यातून एकदा Roughness Index ची चाचणी व त्याअनुषंगाने रस्त्याच्या स्थितीचा आढावा घ्यावा.

५) कार्यकारी अभियंता यांनी Roughness Index च्या अहवालाच्या अनुषंगाने दर महिन्याला रस्त्याच्या स्थितीचा आढावा घ्यावा.

६) उद्योजकाने रस्त्याची दुरुस्ती न केल्यास करारनाम्यातील तरतूदींकरीता विधी सल्लागाराचे मत घेण्यात यावे व त्यानुसार उद्योजकास रस्ता दुरुस्ती / नुतनीकरण करण्याकरीता १५ दिवसांची नोटीस देण्यात यावी. उद्योजकामार्फत प्रत्येक महिन्यात Roughness Index घेण्यात येत नसल्यास संबंधीत कार्यकारी अभियंता यांनी सदर कार्यवाही MERI कडून करुन घेण्यात यावी व यासाठी येणारा खर्च उद्योजकाला देय असलेल्या कार, जीप व तत्सम हलकी वाहने, एस.टी. बसेस व स्कूल बसेस यांना सूट दिल्यामुळे उद्योजकास देय असलेल्या नुकसान भरपाई रक्कमेतून करण्यात यावा.

७) प्रत्येक खाजगीकरण प्रकल्पाचा Roughness Index चाचणीचा अहवाल विभागाच्या संकेतस्थळावर शासनाच्या ITCC Pune मार्फत नियमित प्रसिध्द करावा.

८) मंजूर निविदेतील शर्तीनुसार सदर नुतनीकरण करण्याबाबत उद्योजकास कळवावे, अगर उद्योजक नुतनीकरण करीत नसल्यास त्यांना देय असलेल्या कार, जीप व तत्सम हलकी वाहने तसेच स्कूल व एस.टी. बसेस यामुळे देण्यात येणा-या नुकसान भरपाईतुन सदर खर्च भागविण्यात यावा.

९) वरील बाबींचे काटेकोरपणे पालन करण्यात येऊन केलेली कार्यवाही शासनास अवगत करावी.

वरील सर्व बाबींचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल याची खबरदारी संबंधीत कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता व मुख्य अभियंता यांनी घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१७१०३०१७१६४८९४१८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra G Javalkoti

Digitally signed by Ravindra G Javalkoti
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Works Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1921096e6048adbb8484d37e7858572fad8f3d5a1c01b22b76fd483a7263c58e, cn=Ravindra G Javalkoti
Date: 2017.10.30 17:04:30 +05'30'

**(र. घा. जावळकोटी)**
अवर सचिव (खा.र.२), महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
२) सर्व मुख्य अभियंते, सार्वजनिक बांधकाम विभाग
३) सर्व अधिक्षक अभियंते, सार्वजनिक बांधकाम विभाग
४) सर्व अधिक्षक अभियंते, सार्वजनिक बांधकाम विभाग.